॥ श्री ॥

28049

# देवनाथ महाराज

## यांचें चरित्र.

आवृत्ति-दुसरी

किंमत ४ आणे.

सन १९०९.

हें पुस्तक

यशवंत गोविंद केसकर यांनीं

उमरावती येथें

प्रमोदसिंधु छापखान्यांत

छापून प्रसिद्ध केलें.

# देवनाथ महाराज.

या सत्पुरुषाचा जन्म गेल्या शतकांत वऱ्हाडप्रांतीं झाला असून याची या प्रांतीं व नागपुराकडे मोठीं ख्याती होऊन गेली. या साधु पुरुषाच्या कोटींत त्या वेळेस या प्रांतीं व आसपास शेंकडों कोशपावेतों कोणी झाल्याचें श्रुत नाहीं. वस्तुतः त्यापूर्वीं व त्यानंतर या देशांत असा सत्पुरुष झाल्याचें ऐकिवांत नाहीं. अशा प्रकारचे सत्पुरुष आपल्यामागें आपल्या स्मरणार्थ सत्कीर्तीशिवाय अमोलिक ग्रंथभांडार ठेवून गेलेच आहेत. त्याप्रमाणें देवनाथ महाराजांनींही ती अनुपूर्वी अनुसरली आहे. सत्पुरुष आणि कवी ह्या वस्तु भिन्न आहेत. करितां अशा सत्पुरुषांचे ग्रंथांस कवित्वदृष्ट्या मोठेसें महत्व नेहमींच असतें असें नाहीं आणि तशा दृष्टीनें त्यांच्या कृतीकडे पाहणेंही योग्य नाहीं. अशा सत्पुरुषांचे ग्रंथ ब्रह्मज्ञाननिरुपण, ईश्वरीलीला कथन, संसारपरित्याग, परमार्थसाधन, सदुपदेश इत्यादि पारमार्थिक विषयांवरच असावयाचे. तेव्हां ऐहिक विषयाविष्करण, इतिहासकथन, मनोरंजन इत्यादिक करण्याचा ज्यांचा प्रधान हेतु अशा ग्रंथाप्रमाणें अलंकारप्रास इत्यादि भूषणें परमार्थप्रतिपा-

दक ग्रंथांस वस्तुतः नकोतच. रामदास स्वामीच्या दासबोधाकडे काव्यदृष्टीनें लोक पाहत नाहींत. अर्थात् कवित्व व साधुत्व यांचा नेहमीं जोड असतो असें नाहीं व असण्याची जरूरही नाहीं. सदुपदेश केवळ साधुच करतात व अन्य संसारिक करीत नाहींत असें नाहीं. जीं तत्वें साधु स्वमुखानें किंवा ग्रंथ-द्वारां प्रतिपादित करितात तीं इतरानींही प्रतिपा दिलीं आहेत व अद्यापि ते प्रतिपादीत आहेत. परंतु प्रतिपादकांच्या ऐहिक पारमार्थिकपरायणतेच्या भेदामुळें उपदेश हेतुसिद्धींत फरक होतो असा अनुभव आहे. ह्मणजे सत्पुरुषाच्या मुखाचा उप-देश जितका लोकांस ग्राह्य होतो व त्यांचे मनावर तो ठसतो तितक्या प्रमाणानें तोच उपदेश संसारि-काच्या तोंडानें मिळाल्यास ग्राह्य होत नाहीं व ठसत नाहीं. असें होण्यास समर्पक हेतु कदाचित् सांगतां येणार नाहीं. कारण सदुपदेशाचें स्वतंत्र महत्व अनुसंगिक कारणानें वस्तुतः कमी जास्त होऊं नये. दुधाच्या स्वादमाधुर्यादिक गुणांचा अनुभव तें सोन्याच्या किंवा मृत्तिकेच्या पात्रानें प्याल्यानें वस्तुतः सारखा व्हावा व तत्वदृष्ठ्या पाह-णारास होतो. पण पात्राच्या आनुसंगिक कारणानें पुष्कळांस होत नाहीं. सोन्याच्या पात्रानें दिलेलें दुध अधिक ग्राह्य व अधिक आनंदप्रद असें वाटणारे पुष्कळ. ह्मणून दुध करवंटींत दिलें असतां जे

घेणार नाहींत ते सुवर्णपात्रांत दिलें असतां घेतात. या न्यायानें भगवद्भक्ताच्या तोंडचा सदुपदेश लोकांचे मनावर अधिक ठसतो तसा सांसारिकांनीं केल्यास ठसत नाहीं. हा साधुमुखानुसंगाचा लाभ आहे. व दुसरा लाभ असा आहे कीं या सत्पुरुषांची कविता महाराष्ट्र भाषेंत असल्यामुळें अशिक्षितांसही तिचा भावार्थ अंशतः तरी समजण्याचा मार्ग आहे. ज्यांस लेखनवाचनाचा संस्कार असेल त्यांना वाचून, तितकेंही साधन नसणारांस ऐकून, पारमार्थिक विषयांचें अल्पस्वल्प ज्ञान होऊं शकतें. आणि वस्तुतः अशिक्षित लोकांत जी आस्तिक्य बुद्धि सांप्रत कायम आहे ती तुकारामरामदासादि सत्पुरुषांच्या महाराष्ट्र भाषेंतील ग्रंथांचें मुख्यत्वेंकरून फळ आहे. गहनसंस्कृतभाषागुंफित अति गहन वेदांतविषयास्वाद घेण्यापुरतें सामर्थ्य लक्षावधींत एकास असेल नसेल. म्हणून जगाहून निराळा न दिसणारा परंतु सर्वत्र भरलेला असा महा समर्थ ईश्वर आहे, त्यास भिऊन जीवमात्रानें चालले पाहिजे. आपण बरेंवाईट करतों तें त्या सर्वव्यापक परमात्म्यास दिसतें, दुष्कर्मास दंड आहे, सत्कर्मापासून पुण्य व सुख यांची प्राप्ति आहे; इत्यादि ईश्वराच्या अस्तित्वाच्या व त्याच्या शक्तिच्या सामान्य स्थूल कल्पना लोकसमूहास आमच्या साधुसंतांनींच करून दिल्या आहेत. व त्यांनींच त्या

अजून जागृत ठेविल्या आहेत.

या लेखाचा विषय जो सत्पुरुष देवनाथ यानीं पुष्कळ कविता केलेल्या असाव्या असें दिसतें. यांच्या कांहीं कविता रा० रा० वामनरावजी ओक यांच्या काव्यसंग्रहात प्रथमच प्रसिद्ध झाल्या आहेत. अद्यापि अप्रसिद्ध अशा बऱ्याच कविता त्यांचे शिष्यमंडळींचे संग्रहीं असाव्या असा आमचा तर्क आहे व त्या मिळाल्यास लोकहितार्थ प्रसिद्ध कराव्या असा आमचा मानस आहे. परंतु यांच्या कवितांचा विचार करण्यापूर्वी त्यांचे संबंधीं जी माहिती त्यांच्या शिष्यपरंपरेतील एका भाविक गृहस्थाकडून आह्मांस मिळाली आहे तीवरून तयार केलेलें पुढील संक्षिप्त चरित्र आमचे वाचकांस सादर करावें असा विचार केला आहे.

देवनाथ हे सत्पुरुष वऱ्हाडप्रांतीं इलिचपूर जिल्ह्यांत सुरजी या गांवचे राहणारे होते. त्यांचे तीर्थरुपाचें नांव राजोपंत असें होतें. ते गृहस्थ आश्वलायन शाखेचे असून त्यांस तिघे पुत्र होते. वयाचे अनुक्रमानें व्यंकटराव, देवराव, व सुंदरबाबा हीं त्यांचीं नांवें होतीं.

शके १६८२ (इ. स. १७६०) या सालीं देवनाथ (मूळचें नांव देवराव) यांचा जन्म झाला.

यांचे पूर्वजांचे संबंधानें कांहीं विशेष गोष्ट ऐकण्यांत नाहीं. त्या काळीं रीतिवार विद्याव्यासंगाची चाल किंवा साधनें विशेष नसावींत असें दिसतें. तशांत सुरजी हें खेडेगांव अर्थात् इतर मुलांप्रमाणेंच देव-रात यांच्या बाल्यावस्थेचे दिवस गेले. तारुण्यांत कसरतीचा मोठा नाद त्यांस लागला. जोडी करणें, मुद्गल फिरवणें बैठका मारणें वगैरे तालिमबाजींचीं कामें करण्यांत त्यानां फार हौस असे. साधारणतः असल्या प्रकारचे नादी मनुष्यास शरीर सुदृढ कर-ण्याशिवाय अन्य व्यापार कांहीं सुचावयाचा नाहीं. पण असा प्रकार देवराव यांचा नव्हता. लहान-पणापासून कथापुराण श्रवण करणें, तसेंच हरप्रयत्न करून सत्पुरुषांचें दर्शन घेणें वगैरे गोष्टींकडे यांचे मनाचा कल असे. साधारण लिहिणें वाचणें या-पलीकडे अधुनिक रीतिचें त्यांस कांहीं शिक्षण झाले-लें असावें असें दिसत नाहीं. त्यांचा स्वभाव अति तामसी होता. त्यांचें शरीर कसलेलें, सुदृढ असून त्यांचा बांधा मध्यम होता ह्मणजे ते फार उंचही नव्हते किंवा अति ठेंगणेही नव्हते. त्यांचे नेत्र मोठे असून त्यांचा वर्ण मध्यम काळा होता. ते धोतरें नेसत; आंतून मात्र कौपिन कसलेलें असे. त्यांचे यज्ञोपवितांची नेहमीं उपवीति असे. सारांश, तालीमबाज लोकांत जो अल्लडपणा, तामसवृत्ति, बेपर्वाई, विद्येविषयीं अनभिरुचि वगैरे जे गुण दृष्टीस

पडतात ते देवनाथांचे बाळपणीं त्यांच्या अंगीं वसत होते.

तालीमबाजपणाचे वृत्तींत कालक्रमणा करीत असतां घरांतील माणसांचे सांगण्याकडे दुर्लक्ष व स्वच्छंदानें वागणूक तसेंच अविद्वान अर्थात् हलकट लोकांची सहोईंत संगत इत्यादि अवगुण त्यांस सहजच जडले. अशा स्थितींत लोकांस नानाप्रकारचीं व्यसनें लागत त. तदनुरुपच देवराव यांस गांजा, भांग तमाखु यांचा छंद लागला. कुलशीलवंताचे मुलांस असलीं व्यसनें लागलीं असतां तीं विशेष लांछनास्पद होतात. त्यांस कोणी पुसत नाहीं इतकेंच नाहीं परंतु त्यांचा लोक तिटकारा करतात. इतर लोक त्यांचा तिरस्कार करतात इतकेंच नाहीं तर घरचे देखील त्यांस बरें पहात नाहींत. याचप्रमाणें देवरावांचे वडिलांचा त्यांचेवर राग होता. ते त्यांच्याशीं बोलत नसत व त्यांच्याशीं कोणत्याही प्रकारचा व्यवहार ठेवीत नसत. घरांतच अशी स्थिति मग इतर लोकांविषयीं काय ह्मणायाचें आहे? देवराव हे सर्वांस नावडते झाले. त्या काळच्या बालविवाहाचे चालीप्रमाणें त्यांचें लग्न त्यांचे बाळपणांतच व्हावें परंतु छांदिष्ट व भांगट स्वभावामुळे व स्वछंदानुवर्तनाचे कारणानें त्यांचें लग्न झालें नाहीं.

निष्काम कर्माचरणानें अनेक जन्मींचा चित्ताचा मल कमी होत जातो व वैराग्योत्पत्ति होते. सद्गुणोपासनेचा जसजसा दृढतर अभ्यास होत जाईल तसतसें तें वैराग्य स्थिरावतें व शमदमादि साधनें करण्याचा इच्छा उत्पन्न होते. सगुण साक्षात्कार झाल्यावर तें दृढतर होत जाऊन इतर संसारनिमग्न लोकांबद्दल मनांत करुणा उत्पन्न होते व उपासनेच्या बलावर इष्टकार्य (म्हणजे सांसारिक मनुष्याचे मनांत ऐहिक परलौकिक सुख हो केवळ भ्रांति आहे असा भाव उत्पन्न करणें) ते साधतात. हें उपासनानिरत मनुष्यांविषयीं झालें तें वैराग्य पूर्वावस्थेंत पोंचल्यावर सत्पुरुष करुणेनें परिपूरित होऊन जातात हें काय सांगावयाचें आहे? म्हणून तुकाराम महाराज म्हणतात कीं "मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास." श्री मारुतीचा सगुणसाक्षात्कार झालेल्या कोटींतील एका मंत्र्यानें देवरावांची करुणास्पदवृत्ति पाहून त्यांस त्यांची दया आली. देवराव यांस महारुद्र मंत्र सांगून श्री मारुतीचें प्रत्यक्ष दर्शन करवून देण्याचा निश्चय करून त्यासाठीं अनुष्ठान कसें करावयाचें याची सर्व क्रिया त्या मंत्र्यानें देवरावांस सांगितली. श्रद्धा ही परमार्थसाधनाचा आधारस्तंभ होय. पाया अढळ नसला म्हणजे वरील इमारत जशी डळमळून कधीं कधीं जमीनदोस्त होते तद्वत्, श्रद्धेवांचून परमार्थसाधन

स्थिर नाहीं. मंव्यानें सांगितलेल्या मंत्राचें पुरश्चरण श्रद्धापूर्वक देवराव ह्यांनीं केलें. परंतु क्रियेंत कांहीं अंतर पडलें किंवा मंत्रांत कांहीं चळ पडला ह्मणून देवराव वेड लागल्यासारखे करूं लागले. कारण देवी, मारुती यांच्या मंत्रानुष्ठानांत किंचित् वैपरीत्य झालें तर अनुष्ठानकर्त्याचे बुद्धीस भ्रंश होतो असा आस्तिक लोकांचा समज आहे. बुद्धिभ्रंश होण्यास मन्त्रानुष्ठानांत कांहीं अंतर पडलें असेल असें वाटून ज्या मांत्रिक गुरूनें तें अनुष्ठान देवराव यांजकडून करविलें होतें त्यानें पुनः तें देवरावांकडून सांग करविलें. पुढें कांहीं अवधीनें मारुतीचा सगुण साक्षात्कार देवरावांस होऊन त्या देवतेनें देवरावांस वर मागण्यास आज्ञा केली. देवरावांनीं ऐहिक सुखोपभोगाच्या वस्तु न मागतां, श्री रामनांवाचा मनास व जिव्हेस विसर कधींही न पडावा, असा वर मागितला. असे ह्मणतात कीं त्या देवतेनें देवरावांचे जिव्हेवर श्रीराम हीं अक्षरें स्वहतें काढलीं होतीं. हीं जिव्हेवरील अक्षरें ज्यांनीं पाहिलीं ते सांगतात कीं हातावर जशा रेषा असतात त्याचप्रमाणें देवरावाच्या जिव्हेवर रामनामरेषा दिसत असत.

ह्या साक्षातत्कारानंतर पूर्वीचा पोरकट स्वभाव व नानातऱ्हेचे छंद कमी कमी होत जाऊन देवरावांचा सर्व काळ श्रीराम व मारुती यांचें भजनपूजन

व ठिकठिकाणीं त्यांनीं केलेल्या आज्ञांचें मनन व निजध्यासन करण्यांत जाऊं लागला. मिळवितां मुलगा असला ह्मणजे जनांत तो प्रिय होतो. देवराव यांची वृत्ति अगदीं विजातीय असल्यामुळें त्यांची घरची दारची सर्व मंडळी त्राग्र करूं लागली.

"ज्ञानादेवतु कैवल्यं" या भगवदुक्ती वरून केवळ सगुणोपासनेंत पारंगतता प्राप्त झाल्यानें खरी कृतार्थता प्राप्त होत नाहीं. यामुळेंच नामदेवास श्रीपंढरीनाथानें विसोबा खेचर याजकडे जाण्यास उपदेश केला होता ही गोष्ट प्रसिद्ध आहेच. नामदेवास विसोबा खेचर यांचे उपदेशानें सर्वाभूतीं भगवद्भाव उत्पन्न होऊन खरी कृतार्थता मिळाली. खऱ्या मुमुक्षूस कृतार्थ करण्यची काळजी उपास्य देवतेस असते व तीच सद्गुरूची गांठ घालून देते असा सज्जनांचा दृढतर विश्वास आहे. देवनाथाचा अंतर्मल नाहींसा होऊन मोक्षोपदेशास खरे पात्र झाले असतां यदृच्छेनें त्यांचे गांवींच, ह्मणजे अंजनगांवीं, देवराव यांचे वयाचे २१ वे वर्षीं गोविंदनाथ महाराज नांवाचे कोणी साधु आले. हे कोंकणस्थ होते. गांवांत या सत्पुरुषाचे आगमनाची वार्ता पसरतांच देवराव हे पूर्ववहिवाटीप्रमाणें साधुदर्शनास गेले. देवरावास पाहतांच त्यांचे त्रिविधताप वैराग्याग्नीनें समूळ दग्ध झाले आहेत व हे शुद्धांः

तःकरण झालेले असल्यामुळें हे सदुपदेशास योग्य आहेत करितां उपदेशामृत यांस पाजावे असें मनांत आणून, गोविंदनाथ त्यांस ह्मणाले कीं, तुह्मी आमचा उपदेश घेतां काय? भगवंताची सर्वत्र व्याप्ति आहे असा अनुभव या वेळांपावेतो देवराव यांस आलेला नसल्यामुळें माझा श्रीराम व मारुती हेच काय तें माझें सर्वस्व अशी त्यांची दृढतर भावना होती ह्मणून, मला माझ्या देवतांची आज्ञा झाल्यास मी तसें करीन असें देवरावांनीं उत्तर दिलें. एखादे दीनाविषयीं एखादा समर्थ मनुष्याचे मनांत अभिमान उत्पन्न होऊन त्यानें त्यास हातीं धरलें ह्मणजे हरप्रयत्न करून तो त्यास उच्चस्थिति प्राप्त करून देतो ही गोष्ट लोकप्रसिद्ध आहे. मग ज्या प्राण्याविषयीं कर्तुमकर्तुं समर्थ भगवंताचे मनांत करुणा उत्पन्न झाली तो त्याला महान् महान् साधूंनीं स्पृहणीय अशा पदास पोंचवील हें सांगावयास नको. देवरावांनीं घरीं जाऊन रात्रौं मारुतीची प्रार्थना केली व गोविंदनाथांचें ह्मणणें कळविलें. मारुतीस तेंच कर्तव्य होतें. देवराव निजलें असतां त्यांस दृष्टांत झाला कीं गुरूपदेशावांचून इच्छित मोक्षप्राप्ति नाहीं करितां गोविंदनाथांचा उपदेश जरूर घ्यावा व ते उपदेश देण्यास समर्थ आहेत. सकाळीं उठतांच देवराव गोविंदनाथ महाराजांकडे जाऊन उपदेश घ्यावा

अशी प्रार्थना करूं लागले. गोविंदनाथांचे मनांत तें कर्तव्यच होतें. मग देवराव यांस एका निर्जन अरण्यांत नेऊन तेथें उपदेश केला व त्यांच्या मस्तकीं हात ठेवून कृतार्थ करून सोडलें. देवरावांनीं तेथेंच शहानूर नदीचे उदकानें व पर्णपुष्पांनीं गुरुमहाराजांचीं पूजा करून ते उभयतां परत गांवांत आले. देवरावांस कृतार्थ करण्यास गोबिंदनाथांस किंचितही अवधि लागला नाहीं. कारण प्रखर सूर्यतापानें तापलेले जमिनींत बीजारोपण करून मेघवृष्टि झाली म्हणजे जसें होतें तद्वत् सदुपदेशाचा अमृतवर्षाव झाल्यानें तत्वज्ञानफल सहज प्राप्त झालें. एका मुमुक्षूनें श्री समर्थांस विचारिलें कीं साधूचे संगतीनें मुक्ति किती दिवसांत प्राप्त होते? समर्थांनीं सांगितलें कीं कालावधि मुळींच लागत नाहीं; सत्समागम होतांच आपण बद्ध आहों ही जी समज ती खोटी आहे; बद्ध मुक्त ही भावना व्यर्थ आहे असा निश्चय बाणतो; व तत्काल डोळे उघडतात. अंजनगांव येथें शिष्यांसहवर्तमान कांहीं दिवस राहून नंतर गोविंदनाथ महाराज घुस्सर या गांवीं गेले. घुस्सर हें अकोलें तालुक्यांत आहे. तें अगदीं मोडकळीस आलें होतें पण तें बऱ्हाणपूरकर पाडुरंगनाथ यांनीं कांहीं वर्षांपूर्वी दुरस्त केलें असें ऐकतों.

गुरु हे आपल्या सामर्थ्यप्रभावानें सच्छिष्यास

आत्यंतीक सुखसोहळा थोड्या अवधीपर्यंत अनुभवास आणून देतात. तितक्यानेंच कार्यभाग होत नाहीं. जीवन्मुक्त स्थितीचा अनुभव येणें हें परमावधीचें व खरें सुख होय. तें गुरुप्रणीत मार्गावलंबनावांचून तसेंच त्याचें एकांतांत मनन व निजध्यासन यावांचून कधींहि प्राप्त व्हावयाचें नाहीं. व ही इच्छा व इच्छित फलप्राप्ति होई तोंपावेतों दृढनिश्चय हीं गुरुप्रसादाशिवाय होणें नाहींत. कारण त्यांत नानाविध विघ्नें येतात. तीं सर्व टाळून व निवारून टाकण्याचें सामर्थ्य पाहिजे. ह्मणून तुकारामानीं हा परमार्थ मार्ग मोठा कठिण आहे असें लिहिलें. ते ह्मणतात " चणे खावे लोखंडाचे तेव्हां ब्रह्मपदीं नाचे " हेंच मनांत आणून देवरावांनीं गुरू गोविंदनाथ यांनीं सांगितलेल्या रीतीनें एकनिष्ठ वर्तन ठेविलें व ते सत्कालक्षेप करूं लागले. जगांत सर्वच नास्तिक असतात असा अर्थ नाहीं. देवराव हे ज्या गांवीं रहात होते तेथें कांहीं भाविक गृहस्थ होते. त्यांनीं देवराव यांचें आयुष्य सत्कालक्षेपांत चाललें आहे; आचारण चोख, सचोटीचें, आंत एक, बाहेर एक असें त्यांत कांहीं नाहीं; व त्यांचे आचरणांत सहज घडून आलेले चमत्कार, हे सर्व पाहून देवरावांची कसरत करण्याची जी जागा होती तीवर त्यांचे करितां एक मठ बांधिला. व

त्यांत अत्याग्रहानें तेथें राहण्याची विनंति केली. भाविक लोकांनीं हा मठ जरी त्यांचे करितां बांधला होता तरी ते त्या ठिकाणीं फारसे रहात नसत. कधीं गुरुदर्शनास त्यांचे गांवीं जात; संतसाधु, पुण्यतीर्थे व पवित्र स्थलें, क्षेत्रें, देवालयें पाहण्यांत ते नेहमीं हिंडत असत यामुळें त्यांचा काल बहुतेक बाहेर फिरण्यांत जाई.

देवराव पुढें कविता करूं लागले. कवितेचे अंतीं 'देवराव' असें आपलें नांव लिहित असत; परंतु गुरूचे आज्ञेनुरूप ते आपले नांवापुढें "राव" न लावतां "नाथ" असें लिहूं लागले व 'देवनाथ' या नांवानेंच लोकांत पुढें प्रसिद्ध झाले. ते नानाविध छंदात कविता करीत असत. त्यांच्या कविता मराठी, उर्दू व ब्रिजभाषा यांत केलेल्या आहेत. देवनाथांनीं केलेल्या कवितांवरून व पूर्वीं उल्लेखिलेल्या गोष्टींवरून असें स्पष्ट दिसतें कीं ते आरंभीं मारुती उपासक होते. ही उपासना करीत असतां कांहीं दिवसानीं त्यांचेवर गुरु गोविंदनाथ यानीं अनुग्रह केला हें वर लिहिलेंच आहे.

गुरु गोविंदनाथ यांच्या अनुग्रहानंतर सुमार सहा वर्षांनीं गुरु गोविंदनाथ हे मोगलाईंत जान्हे या गांवीं आनंदीनाथ या नांवचे सत्पुरुष रहात होते त्यांचे दर्शनास गेले. परस्परांच्या भेटी होऊन क्षेमकुशल विचारणें झाल्यावर आनंदीनाथांनीं

गोविंदनाथ यांस प्रश्न केला कीं तुम्ही सन्मार्गप्रवर्तन करण्यास योग्य असा एखादा शिष्य तयार केला आहे काय? उत्तरीं गोविंदनाथानीं देवनाथाचें नांव सांगितलें व त्यावर आपली कृपादृष्टि असावी अशी आनंदीनाथांची विज्ञप्ति केली. इकडे देवनाथहि गुरुदर्शन घ्यावें या इच्छेनें फिरत फिरत गुरुमहाराजांचा शोध करीत जान्हे गांवीं आले. तेथें गोविंदनाथ व त्यांचे स्नेही आनंदीनाथ यांचें दर्शन घेऊन कृतार्थ झाले. आनंदीनाथ यांनीं देवनाथ यांस विचारलें कीं गोविंदनाथांचा अनुग्रह झाल्यापासून सन्मार्गदर्शक अशा कांहीं गोष्टी तुमचे हातून झाल्या किंवा नाहीं? थोडा अधिकार प्राप्त झाल्यावर मनुष्य निरभिमान राहणें हें फार कठीण आहे मग देवनाथांचे कोटीच्या मनुष्यास पुष्कळ गर्व व्हावा. परंतु खरा खरा परमार्थेच्छु विकारास आपल्या सावलीसही स्पर्श करूं देत नाहीं. देवनाथांनीं परम नम्रतेनें उत्तर केलें कीं मी अल्पज्ञ मनुष्य, आपल्यासारख्या थोरांचे हातून घडणारीं कृत्यें माझ्यासारख्या पामरानें कशीं करावीं? सद्गुरूचीं कामें तेच करूं जाणतात. असें लीनतेचें भाषण ऐकून आनंदीनाथांस फार संतोष वाटला व त्याचे मस्तकीं वरदहस्त ठेवून तुजवर नाथ कृपा करतील असा आशीर्वाद दिला व त्यांचें मुख कुरवाळलें.

असें सांगतात कीं देवनाथांची काया गोविंद-नाथ यांनीं उपदेश केल्यापासून तेजःपुंज झाली होती पण त्यांचे मुखावर थोडे मलाचे डाग होते ते आतां आनंदीनाथांचे कुरवाळण्यानें दूर झाले; मात्र आनंदीनाथांचे हातास त्या मुखमलाचा डाग लागला होता तो पुढें कांहीं दिवसांनीं नाहींसा झाला.

गुरुप्रसाद झाल्यावर रंकाचा राव व अविद्वा-नाचा विद्याविभूषित होण्यास कांहीं विलंब लागत नाहीं. एके दिवशीं गुरु गोविंदनाथ हे आनंदी महाराजांसह झोंपाळ्यावर बसले होते. आपले हातुन अल्पशी कां होईना परंतु गुरुसेवा व्हावी म्हणून देवनाथ झोंपाळा हालवीत उभे होते तों गुरु गोविंदनाथ यांनीं त्यांचेकडे प्रसन्न मुद्रेनें पाहून ते त्यांस म्हणूं लागले कीं "कुछ आता हो तो (आनंदीनाथाकडे खुणेनें दाखवून) महाराज का महिमा गाव." ही आज्ञा ऐकून देवनाथ यांनीं गुरूस नमस्कार करून झोके देत असतां आनंदी-नाथाची लावणी छंदांत कविता करून भक्तिभावानें वर्णन केलें. तें येणेंप्रमाणें:—

## लावणी

अरूपानंदीं अद्वय श्रीगुरुदत्तचि अवतरला ॥ गुरूची अद्‌भुत गुणलीला ॥ ध्रु० ॥ हा नाथ नाथ कलियुगांत करितो मात बहूभारी । पहा हा मानव-

तनुधारी ॥ ना ब्राह्मण ना क्षत्रिय वैश्य शूद्र वर्णे चारी ॥ चहूंतील हा ब्रह्मचारी ॥ ब्रह्मचारी गृहस्थ-वान प्रस्थ त्रिपुट सारी ॥ नोहे हा यतिवेषधारी ॥ परमहंस परमात्मा आनंदी सच्चित्घन पुतळा ॥ गुरूची अद्भुत गुणलीला ॥ १ ॥ निर्विकल्प हा निर्विकार आकार धरी एका । प्रभू हा पालवी भा-विका ॥ प्रेमें पायीं तरिता ठायीं निजसुखसाधका ॥ भवजलतरणीं पहा नौका ॥ पूर्ण सिद्ध हा प्रसिद्ध मनींचा कल्प समूळ टाका ॥ भावें वदनीं नाम घोका ॥ नाम करील आराम सर्वही चुकेल यम घाला ॥ गुरूची अद्भुत गुणलीला ॥ २ ॥ हा योगिराज महाराज मोडितो माज दुर्जनांचा ॥ पूर्ण सहाकारी दासाचा ॥ चहु देहाचे साक्षे चढवुनी घाट उन्मनीचा ॥ खेळतो निजानंद साचा ॥ निजानंद आनंद कंद पूर्ण निरद्वंद स्वरूपाचा ॥ ठायीं हा योग समाधिचा ॥ निजात्मा बोधे उघड समाधी पूर्णपणें धाला ॥ गुरूची० ॥ ३ ॥ वदे नाथ बाळ लडिवाळ किती पाल्हाळ शद्ववाणी ॥ अरे हा योगी महाज्ञानी ॥ ज्ञान आणि विज्ञान प्रासुनि योग कसे दोन्ही ॥ नांदतो निजातमनिज-भुवनीं ॥ दत्तदत्त अवधूत दिगांबर श्रुति गाति गाणीं ॥ तोचि हा देखियला नयनीं ॥ देवनाथ ह्मणे नाथ आमुचा पूर्ण ओळखिला ॥ गुरूचि० ॥ ४ ॥

## लावणी

सच्चित्घन आनंद आनंदी दत्तात्रय मूर्ती ॥ कलियुगीं धरि अवतार कीर्तिही व्यापक त्रयजगतीं ॥ ध्रु० ॥ गुणातीत जो निर्गुण तो गुणरूपीं प्रगट झाला ॥ अज अव्यय अनुपम्य आनंदी अनादिचा पहिला ॥ नामनिरूपण गुण जयातें अरूपरूप ठेला ॥ ताराया जड मूढ दयाब्धी रूपें उचंबळला ॥ १ ॥

श्लोक—एकी अनेक नटला प्रभु तोचि हाकीं ॥ ज्याची सदा सद्य जो श्रुति कीर्ति हाकी ॥ आकार हा धरित तारक नीज भक्ता ॥ संरक्षुनी द्विजजना निवटी अभक्ता ॥ १ ॥

टीप– ब्रम्हा विष्णु रुद्र त्रयशी ऐक्यरूप ज्योती ॥ मानवतनुचा थाटघाट एक अघटित तव स्थिती ॥ १ ॥

महाद्भुत हा नाथ दीनाचा अद्भुत विभुसत्ता ॥ उंकाराचें मुळ सकळ जो क्षरक्षरा ॥ साराच निजसार खरा अवतार भुमीवरता ॥ अद्वय अपरंपार सार जो मानवतनुधरिता ॥ २ ॥

श्लोक–तो तोचिहा नरतनु धरि या कलीला ॥ स्वानंदयुक्त जगीं दावितसे स्वलीला ॥ बालोन्मतादिक पिशाच गतीस दावी ॥ दावी स्थिती अघटितास, किती वदावी ॥ २ ॥

टीप—चिद्घन घनचैतन्यपूर्ण हा साक्षि सर्व भुतीं ॥ दे पदवी सायुज्य त्यासी सद्भावें स्मरती ॥ १ ॥ महारंगिं खेळतो अभंग पद ज्याचें ॥ अनुभविं घे निजखूण जाणती भाग्य भाविकाचें ॥ धरुनि कल्पना कुभाव मानिती मानव जे सांचे ॥ रौरवगति भोगिती वदों किती जळो तोंड त्याचें ॥ २ ॥

श्लोक–संगी असोनि हि नेणति संगधारी ॥ छेदील काळ धरुनी शिर खड्गधारीं ॥ हा योगिराज महाराज जगन्निवासा ॥ हो भाविकासि विभुच्या स्वपदीं निवासा ॥ ३ ॥

टीप–नाथ नाथ ह्रदयांत प्रीतिनें देवनाथ चिंती ॥ परब्रह्म आनंदी जाणिजे महा वर्म संतीं ॥ १ ॥

स्तवन श्रवण करून आनंदीनाथ व गुरु गोविंदनाथ यांस परमानंद झाला व आनंदीनाथांनीं गुरुगोविंद यांजपाशीं जें गुरुप्रासादित नाथपंथसुचक निशाण होतें तें घेऊन देवनाथ यांस देऊन उभयतांनीं त्यांस आशीर्वाद दिला कीं हें निशाण घेऊन नाथपंथास अनुरूप स्वतःचें वर्तन ठेवून जगदुद्धार करीत जावा.

गुरु गोविंदनाथ यांचा अनुग्रह झाल्यावर देवनाथ हे कविता करूं लागले असें वर लिहिलेंच आहे. परंतु गुरूची आज्ञा होतांच त्यांनीं उभ्या पूर्व विचारावांचुन लावणी व श्लोकरूपानें आनंदी-

नाथांचें स्तवन केलें. यावरून त्याचे अंगीं शीघ्र कवित्व होतें हें उघड आहे व हें शीघ्रकवित्व सामान्य कोटींतील नव्हे. कारण देवनाथांच्या कवित्वशक्तीची अशी कीर्ति आहे कीं त्यांनीं जीं शेंकडों किर्तनें केली त्यांत सर्व पद्यें पदें वगैरे कविता ते स्वतः रचलेल्या ह्मणत. इतर कवींची कविता कधींही उच्चारिली नाहीं. इतकेंच नव्हे तर एका कीर्तनांत जी कविता त्यांनीं स्वतः रचिली त्यांतील एक अक्षरही दुसऱ्या कथेंत घेतलें नाहीं. प्रत्येक कीर्तनांत नवीन कविता ते रचीत. कीर्तन चालू झालें ह्मणजे महाराजांचे दोन शिष्य बाजूस दऊत लेखणी घेऊन बसत व महाराजांनीं ह्मटलेल्या कविता लिहून घेत. दोघां शिष्यांचीं टिपणें एकमेकांशीं ताडून पाहून नंतर कांहीं उणें दिसल्यास महाराजांस तें दुसऱ्या दिवशीं दाखवून शुद्ध करून घेत. यावरून पाहिलें तर देवनाथांच्या कविता पुष्कळ आहेत असा आमचा समज आहे. पण याचा विचार, चरित्र पुरें केल्यानंतर करूं.

ही गुरु गोविंदनाथांनीं केलेली आज्ञा शिरसावंद्य करून देवनाथ तेथून निघाले व फिरत फिरत स्वदेशीं येत असतां मोर्तुजापूर ह्मणून गांव आहे (हल्लीं नागपूर रेलवे स्टेशनवर) तेथें आले. या गांवीं एक यजुः- शाखी गृहस्थ रहात होता.

त्याला संतति होत असे परंतु ती वांचत नसे. अशा स्थितींत नाना प्रकारचे नवस व सायास करणें, नानाविध मंत्रतंत्र, तोडगे व आंगारे करणें, तीर्थी जाऊन नागबलि, नारायणबलि करणें, पुरश्चरणें, व सप्तशत्यादिकांचे पाठ करणें, संतसेवा करणें, ब्राह्मणभोजन वगैरे प्रकार भाविक लोक करीत आले आहेत; प्रसंगविशेषीं संतति चिरायु होण्याकरितां आपल्या मुलांस एखाद्या देवालाही कायमची अर्पण करितात; त्या संप्रदायानरूप ह्या गृहस्थास झालेला श्रीहरी नांवाचा मुलगा देवनाथ साधूचे चरणसेवेशीं अर्पण केला असतां त्यास अकालिक मृत्युभय रहाणार नाहीं असें मनांत आणून देवनाथ मोर्तुजापुरीं आले आहेत असें ऐकून तो आपल्या मुलास घेऊन दर्शनास गेला व त्यानें देवनाथांचे चरणांवर श्रीहरीस ठेवून अति लीनतेनें प्रार्थना केली कीं या मुलास आपली चरणसेवा करण्यांत योजण्याची कृपा व्हावी म्हणजे कालबाधा त्यास होणार नाहीं. कारण " समर्थाचिया सेवका वक्र पाहे ॥ असा सर्व भूमंडळीं कोण आहे " अशी समर्थोक्ति आहे. ही त्या गृहस्थाची विज्ञप्ति देवनाथांनीं मान्य करून त्या मुलास आपले पाशीं ठेवून घेतलें. या वेळीं त्यांचे वय फक्त ५ वर्षांचें होतें.

उपनयनकाल प्राप्त झाल्यावर या मुलांनीं कर-

विला. व " तीर्थे तीर्थे जायते साधुसंगः " ह्या साधुवचनाप्रमाणें संतसंगतींत आपला व त्या मुलाचा काल जावा ह्या हेतूनें त्याला सर्व तीर्थे आपले बरोबर करविलीं व त्याला अनुग्रह घेण्याचा अधिकार आला आहे असें पाहून कांहीं दिवसांनीं त्यावर अनुग्रह केला. व परंपरागत गुरुसंप्रदायानुरूप कर्तव्य गोष्टी करण्यास त्यास सांगून गुरुप्राप्त ध्वज त्याचे स्वाधीन केला व आपण तीर्थे हिंडण्यास निघून गेले.

सत्पुरुषांचे वागणुकीचे हेतूच्या संबंधानें साधारण लोकांचा जो समज तो कधीं कधीं भ्रांतिमूलक असल्यामुळें त्यांस सांप्रतचें वर्णन त्या दिशेस अनुसरून नाहीं असें भासतें. त्यांना वाटतें कीं साधु झाला ह्मणजे त्याला अमुक कशाला, तमुक कशाला त्यानें जंगलांत जाऊन आपला कालक्षेप करावा. परंतु खरा प्रकार असा आहे कीं साधुदीक्षा स्वीकारण्याचे पूर्वगामी कालांत त्यांनीं ज्या वृत्तीचा स्वीकार केला असेल तिचा कांहीं संस्कार मागें राहतो वृत्यंतरानंतरही साधूच्या वागणुकींत तो दिसतो. ह्मणजे बालोन्मत्त पिशाच राजयोग वगैरे जी वृत्ति त्यांनीं धारण केली असेल त्या अनुरोधानें त्यांचें वर्तन असतें यामुळें साधूनीं जंगलांतच काळ घालविला पाहिजे असें होत नाहीं. त्यांत व इतर जनसमूहांत तारतम्य इतकेंच कीं

प्राप्त सुखाबद्दल आनंद व अनिष्ट प्राप्तिबद्दल खेद ही वृत्ति त्यांचमध्यें नसते. कारण साधु हे सुख व दुःख या दोहेंशींही अलिप्त असतात. अर्थात सुखप्राप्तीसाठीं किंवा दुःनिवारणार्थ ते कधींही यत्न करीत नाहींत. दैवयोगें प्राप्त झालेल्या सुखदुःखोपभोगास ते सदासर्वदा सादरच असतात. होईल तें होवो अशी उदासीन वृत्ति त्यांची असते. असो. रंगनाथप्रमाणेंच देवनाथ हे मोठ्या शिलदारी थाटानें रहात असत. ह्मणजे अंगांत भरजरी अंगरखा, पांघरण्यास उत्तम वस्त्र, नेसण्यास रेशिमकांठी धोतरजोडा, डोकीस मौल्यवान पागोटें व गळ्यांत अलीबंद असून त्यास तलवार लटकलेली असे व बसण्यास उमदा घोडा असे. देवनाथांना घोड्यावर बसण्याचा नाद बाळपणीं होता व पुढेंही तो राहिला. एलिचपूरकर त्र्यंबक जगन्नाथ उर्फ सखारामपंत देशपांडे यांस निजाम सरकारांतून बसण्यास पालखीची नेमणूक होती. परंतु देवनाथांस पालखी नाहीं व ते पालखींत बसत नाहींत ह्मणून देशपांडेही पालखींत बसत नव्हते. पुढें या देशपांड्यांनीं व इतर भाविक नागपुरस्थ थोर थोर मंडळींनीं खटपट व मध्यस्थी करून भोंसले सरकाराकडून देवनाथ यांस पालखी देवविली. परंतु देवनाथांस मनापासून पालखींत बसण्याचें आवडत नसे. मंडळीच्या आग्रहावरून

कधीं कधीं तिचा ते घोड्याचे ऐवजीं उपयोग करूं लागले. वैराग्यबहारांत त्यांनीं तीनचार वेळ सर्व ऐहिक ऐश्वर्याचा त्याग करून सर्वत्यागी झाले. तरी त्यांची प्रारब्धगति कांहीं विलक्षण होती तित-क्या वेळींही पुनरपि पूर्ववत् ऐश्वर्यप्राप्ति त्यांस झाली तेव्हां " प्रारब्धकर्मणां भोगादेव क्षयः " या न्यायानें जें जें प्राप्त होईल त्याचा अंगीकार करायाचा असा त्यांनीं पुढें क्रम ठेविला होता.

पुढें देवनाथ महाराजांस अशी इच्छा उत्पन्न झाली कीं कांहीं काळ पावेतों भागीरथीतीर्थवास करावा. म्हणून ते काशीक्षेत्रीं जाऊन राहिले.

देवनाथ महाराज कीर्तन करीत असत ह्मणून पूर्वी लिहिलेंच आहे. यांचें कीर्तन भक्तिरस व वेदांतविषय यांनीं परिप्लुत असल्यामुळें सर्व लोकांस ते फार आवडे व कीर्तनास उत्सुक श्रोतृ-जनाचा मोठा समाज जमे. काशीक्षेत्रीं आल्यावर लवकरच यांचें कीर्तन एका गृहस्थाच्या वाड्यांत माडीवर झालें त्या प्रसंगीं लहानथोर स्त्रीपुरुषांची मोठीच दाटी होऊन गेली. असें सांगतात कीं, त्यांत एक बाई आपल्या अल्पवयी मुलांस कडेवर घेऊन कीर्तनश्रवणासाठीं माडीवर येत असतां कांहीं अपघात होऊन तिचा मुलगा खालीं पडून मृत्यु पावला. त्या वेळेस तिला अत्यंत दुःख झालें हें सांगावयास नकोच. ती विचारी होती.

अशा साधुजनाच्या तोंडच्या हरिकीर्तनश्रवणाच्या सदुद्देशानें येत असतां आपणावर हें परम संकट आलें हें यथार्थ नाहीं; हें या सत्पुरुषानें टाळलें पाहिजे. असा विचार करून व तो हा अपमृत्यु टाळील असा मनांत पूर्ण भाव ठेवून तिनें आपल्या पुत्राचें प्रेत देवनाथ महाराजांजवळ आणून ठेविलें व ती म्हणाली 'महाराज' आपल्या चरणांच्या दर्शनासाठीं व हरिकथा ऐकण्यास मी अति उत्कंठेनें येत असतां माझ्या पुत्रावर मृत्युनें झडप कशी घातली हें मला समजत नाहीं, आपण सर्वज्ञ आहां करितां आपण जाणतां, तरी यास जिवंत करा, नाहींतर मीही आपला प्राण या चरणांवर तत्काल ठेवीन. देवनाथांस महत् संकट पडलें. त्यांनीं त्या बाईस अश्वासन देऊन तत्काल परमेश्वराचा धावा केला व मृत मुलांस जिवत केलें. या प्रसंगीं नाथमहाराजांनीं ईश्वरस्तुतिपर ८२ कडवी केली व शेवटचें कडवें पूर्ण होताच मृत मुलाचे देहांत प्राण आला. या गोष्टीवरून देवनाथांची फार किर्ति झाली, व हा अवतारी पुरुष असें त्यांस लोक समजूं लागले. परंतु मृत बालकास उठविल्यावर देवनाथांनीं असा विचार केला कीं, आपल्या कीर्तनास जनांनीं यावें व त्यासंबंधानें बरंवाईट झाल्यास ईश्वरास संकट घालणें ह्मणजे नवीन उपाधि जडविणें होय; तर ती नको. पूर्वे

पाठाप्रमाणें हरिकीर्तन यापुढें करावयाचें नाहीं अशी त्यांनीं त्याच प्रसंगीं प्रतिज्ञा केली व काशीस पुनः कीर्तन केलें नाहीं. याप्रमाणें कांहीं दिवस लोटले. या समयीं ग्वाल्हेरचे राजाच्या पदरीं मल्हारनाथ नांवाचा एक हुद्देदार वजनदार सद्-गृहस्थ ग्वाल्हेरास रहात होता; हा देवनाथ महाराजांचा शिष्य होता. मल्हारनाथ आपल्या घरीं दरवर्षीं रामनवमीचा उत्सव मोठ्या थाटमाटानें करीत असे. त्यास इच्छा झाली कीं आपले गुरु देवनाथ महाराज उत्सवाचे प्रसंगीं असावे. तद-नुसार मल्हारनाथ यानें देवनाथांकडे जाऊन मोठ्या आग्रहानें त्यांस सन्मानपूर्वक इतमामानें ग्वाल्हेरीस आणिलें. रामजन्माचें दिवशीं सभामंडपांत राम-जन्मासाठीं साधुसंत व इतर पौरजन श्रोतृसमाज फार मोठा जमला होता. मुख्यस्थानीं देवनाथ महाराज बसले होते. त्या प्रसंगीं दौलतराव शिंदे व पुष्कळ लहानमोठे शिंदे सरकारच्या पदरचे कारभारी त्या ठिकाणीं गेले होते. हा मंडप कोटास लागून मोठा कडेकोट तयार केलेला होता. व समोर एक दरवाजा होता. देवनाथ महारा-जांची कीर्तनासंबंधीं ख्याति होतीच. तेव्हां तेथें जमलेले लोकांस त्यांचें कीर्तन ऐकण्याची सहज इच्छा झाली व त्यांनीं देवनाथांचा कीर्तन करण्या-साठीं प्रार्थना केली. परंतु आपण कीर्तन न

करण्याबद्दल केलेली प्रतिज्ञा त्यांनीं त्यांस कळविली. लोक ऐकतना. त्यांचे तोंडून हरिनाम ऐकावयाचेंच असा त्यांनीं फार आग्रह धरिला. लोकांच्या आग्रहामुळें निरुपाय होऊन देवनाथांनीं त्यांची विनंति मान्य केली. पण त्यांस सांगितलें कीं मी यथामति कीर्तन करतों. परंतु परिणामीं यापासून कांहीं ईश्वरीकोपसूचक घडल्यास माझा उपाय चालणार नाहीं व त्याबद्दल मला कोणी दोष न द्यावा. परंतु देवनाथांच्या मनांतील उद्देश न समजून हरिकीर्तन केल्यापासून ईश्वरीकोपाची भीति कशासाठीं अशी मनाची समजूत करून त्यांस कीर्तनास उभें केलें. कीर्तन झालें. परंतु रामजन्माचें कथानक त्यांनीं लाविलें नाहीं. तो भाग नंतर दुसऱ्या हरिदासानें केला. या दुसऱ्या हरिदासाची त्या दिवसाचे प्रसंगानुरूप रामजन्मकथा झाली. कथेचा उपसंहार होऊन आरती होण्याचा समय येऊन पोहोंचला इतक्यांत एक महत् विघ्न आलें. तें असें कीं सभामंडपाचे दारास एकाएकी आग लागली व हां हां म्हणतां सर्व मंडपभर ती पसरली व एकच हाहाकार होऊन गेला. या मंडपाची कशी काय रचना होती हें सांगण्यास कांहीं साधन नाहीं. परंतु या भयंकर प्रसंगीं मंडपांतील मंडळीस बाहेर जाण्यास मार्ग राहिला नाहीं. कांहीं लोकांनीं शिड्या लावून

उड्या घालून व मोडतोड करून प्राण वांचविले. परंतु जमलेली बहुतेक मंडळी मंडपांत सांपडली व बाहेर पडण्यास कांहींच मार्ग राहिला नाहीं. या घोर प्रसंगीं स्वतःविषयीं जरी देवनाथ महाराज उदासीन राहिले तरी प्राणसंकटांत पडलेल्या इतर जनसमुहासाठीं त्यांनीं हळहळ केली. इकडे तिकडे पाहतात तों दौलतराव शिंदे त्यांच्या नजरेस पडले. त्यांस पाहतांच देवनाथांनीं तेथें असलेल्या आपल्या शिष्यवर्गांत कृष्णंभट ह्मणून एक शिष्य होता त्यास हांक मारिली. हा शिष्य शरीरानें सुदृढ व गुरु-भक्तींत तत्पर व संकटांत धीर धरणारा असा होता. त्यास देवनाथ ह्मणाले " कृष्णा, आजपा-र्येतों तूं माझी सेवा मनोभावानें केली; आतां माझी तुला शेवटची अशी आज्ञा आहे कीं, दौलतराव शिंद्यास पाठीवर घेऊन त्यांचा प्राण वांचीव, तुझा गेला तर जावो. " आज्ञा होतांच जिवावर उदार होऊन कृष्णंभटानें धाडस करून तो कोटावर चढला आणि पलीकडे खालीं राम ह्मणून उडी घेतली. शिंद्यास कांहींएक दुखापत न होतां ते संकटांतून वांचले. कृष्णंभटाचे पाय मोडले. शिंद्यांनीं या कामगिरीबद्दल कृष्णंभटास व त्यांचे वंशपरंपरेस दैन्यमुक्त केले असें सांगतात. इकडे मंडपांत अधिकाधिक कल्होळ होत चालला. इतक्यांत एक महंत ह्मणून कुटिल पंडित मुल्हार-

नाथाजवळ येऊन कुत्सित बुद्धीनें ह्मणाला. "म-हाराज, गडबड कशासाठीं, आपण तर प्रतिईश्वर आहां, आपणांस भीति कशाची? 'नैनं छिंदति शस्त्राणि नैनं दहति पावकः' ही भगवदुक्ति आ-पणास अवगत असेलच" देवनाथ ह्मणाले. "यथार्थ आहे. गीतेंतील या वाक्याचें स्मरण आपणाला बरें वेळेस झालें. गीतापाठ नित्य करितां वाटतें." पंडित ह्मणाले "तोंडानेंच पाठ करतों इतकेंच नाहीं पण वर्तनही तसेंच ठेवतों." देवनाथ हांसून म्हणाले "आपण म्हणतां हें जर खरें आहे तर "मयि सर्व मिदं प्रोक्तं सूत्रे मणिगणा इव" किंवा "बीजं मां सर्वभूतानां विद्धि पार्थ सनातनम्" हीं वाक्यें आपल्या पठणांत असतीलच. तेव्हां 'नैनं छिंदति' हें वाक्य केवळ माझ्यासाठींच नाहीं. आपणासही तें सारखेंच लागू आहे." त्यावर पंडितांनीं म्हटलें. 'तर मग मला कांहीं भीति नाहीं'. देवनाथ महाराज ह्मणाले 'उत्तम आहे. आपण दोघेही बसूं या येथें' असें ह्मणून त्या पंडि-ताचा हात धरून त्यास खालीं बसविण्याचा प्रयत्न देवनाथ करूं लागले तेव्हां आपल्या प्राणावर आतां संकट ओढवलें असें पाहून महंतांनीं देवनाथांचे हातास हिसका देऊन पलायन करण्याचा अत्यंत प्रयास केला पण व्यर्थ. या क्षणीं देवनाथांचे आंगची फार काळ पावेतों निद्रिस्थ असलेली ता-

लीमबाजी पुनः जागृत होऊन तिनें महंतास अर्घ्यांसहित भूमीस्पर्श करविला. सर्व बाजूंनी मंडपाला अग्नीनं घेरलेंच होतें हें वर लिहिलेंच आहे. थोड्या वेळांतच आंत सांपडलेल्या मंडळीचें अग्निनारायणानें भस्म केलें.

या अग्निप्रलयांतून मल्हारनाथ हा गृहस्थ बांचला. श्रोतृसमाजाचा व विशेषेंकरून स्वगुरूचा नाश झालेला पाहून मल्हारनाथासारख्या भाविक सद्गृहस्थांस किती दुःख व किती खेद झाला असेल याची कल्पना वाचकांनीच करावी.

देवनाथ महाराजांची कीर्ति ज्यांस सहन होईना अशा मत्सरी पुरुषांनीं सभामंडपास अग्नि लाविला असें ह्मणतात. कांहींचें असें म्हणणें आहे कीं स्वप्रतिज्ञेविरुद्ध देवनाथांनीं कीर्तन केलें त्यामुळें हें प्राणसंकट उद्भवलें. या दोन्ही गोष्टींत कोणतीही खरी असो परंतु आपल्या प्रतिज्ञेचेविरुद्ध कीर्तन केलें असतां कांहीं अपघात होईल अशी जी देवनाथांस भीति होती व जी त्यांनीं कीर्तन करण्यापूर्वी नुकतीच बोलून दाखविली होती ती खरी झाली. काकतालीयन्यायानें याचें समाधान कोणी करोत परंतु या दोन गोष्टी कारण कार्यरूपानें संबंधित दिसतात व अशी कल्पना असंभाव्य नाहीं. तेव्हां या गोष्टींचे उपपत्तीसाठीं या ठिकाणीं काकतालीयन्यायाची नित्य प्रतीति होत. असें मात्र

ह्मणतां येणार नाहीं.

या प्रसंगाची दुःखद वार्ता ग्वाल्हेरी येथील एका गृहस्थानें ब्ऱ्हाणपूर येथील एका आप्तास पत्रद्वारें पाठविली होती. हें अस्सल पत्र शिष्य परंपरेचे हातून रामराव बाबा काळीं यांनीं पाहण्यास मागितलें होतें व तें त्यांनीं जपून आपल्या संग्रहीं ठेवलें होतें. रामराव बाबा काळी यांचे चिरंजीव नानासाहेब काळी यांनीं तें प्रत्यक्ष पाहिलें असून त्यांनींहि तें मोठ्या काळजीनें बाळगलें होतें. परंतु तें आतां पुष्कळ शोध केला असतांहि सांपडत नाहीं. एकंदर त्या वेळेस सभामंडपांत सातशें मनुष्यें जळून मेलीं व त्या संख्येंत महंत पंडित व देवनाथ महाराजहि होते असें त्या पत्रांत लिहिलेलें होतें.

आग्न शांत झाल्यावर पाहिलें असतां देवनाथ महाराज व महंत हें शेवटीं ज्या ठिकाणीं बसलें होतें त्याच्या आजूबाजूच्या मंडळींचीं सर्व प्रेतें सांपडलीं. महंतांचें प्रेत सांपडलें परंतु देवनाथांच शरीराचा कांहीं एक मागमूस लागला नाहीं. त्यांचे अंगावरचा अर्धा जळलेला रुमाल व नेसण्याचे धोत्राच्या निऱ्या एवढें मात्र सांपडले. हें पाहून सर्वांस मोठा चमत्कार वाटला.

झालेल्या अनर्थाबद्दल मल्हारनाथ याजला परम खेद वाटला. परंतु गुरुमहाराजांचे संबंधानें त्यांनीं

अति आक्रोश केला. गुरुदर्शनावांचून अन्नपाणी घेणार नाहीं असा निर्धार करून गुरुमहाराजांचें नामस्मरण करीत ते बसले. याप्रमाणें सहा दिवस लोटल्यावर सातवें दिवशीं त्यांस देवनाथांनीं दृष्टांत दिला कीं, मी ज्या ठिकाणीं मंडपांत बसलों होतों व माझें जळकें वस्त्र सांपडलें त्या ठिकाणीं जागा वीतभर खोल खोदीली म्हणजे तांत एक मारुतीची मूर्ति निघेल ती माझीच असें समजून तुझी माझेवर जशी भावना होती तशी तिजवर ठेव व आतां व्यर्थ शोक करूं नको. दृष्टांत होतांच गुरुचे आज्ञेप्रमाणें जागा खणली व तींत मारुतीची मूर्ति सांपडली. ती पाहून मल्हारनाथांस व इतर मंडळीस मोठा आनंद व चमत्कार वाटला. मल्हारनाथांनें पुढें त्या ठिकाणीं देवनाथमहाराजांची समाधि बांधून तावर मोठ्या समारंभानें मारुतीचे मूर्तीची स्थापना केली. ही समाधि अद्यापि कायम आहे.

देवनाथ महाराजांचे समाधिकाळीं त्यांचे समागमें जी शिष्यमंडळी होती त्या सर्वांस महाराजांचा जळका रुमाल, धोत्राच्या निऱ्या व वीणा वगैरे कीर्तनसामुग्रीसह यांचे मुख्य शिष्य दयाळनाथ यांजकडे ग्वाल्हेरीहून मल्हारनाथांनीं पाठविला. या वेळेस दयाळनाथ अंजनगांवसुरजी येथें होते. त्यांस गुरुनिधनाची वार्ता ऐकून अति खेद झाला. परंतु कांहीं वेळ एकांत विचार करून त्यांनीं तो

दूर केला. देवनाथमहाराजांच्या वस्त्रें वगैरे गुरु-भक्तिस्मारक वस्तु ग्वाल्हेरीहून आल्या होत्या त्यांचा आदरपूर्वक स्वीकार करून त्या प्रसादाचा अर्धा भाग ह्मणजे रुमाल आणि विणा रामराव बाबा काळी यांजकडे इलिचपुरास पाठविला व बाकीचें सामान आपणाजवळ ठेविलें. रामराव बाबा काळी त्या रुमालावर गुरुतुल्य प्रेम व भाव ठेवीत असत व कीर्तनसमयीं तो रुमाल पुढें ठेवीत. थोडे दिवसांपावेतों हा रुमाल काळी यांचे घराण्यांत भक्तिभावानें सांभाळून ठेविला होता. परंतु पंढरीचे रस्त्यांत या रुमालाचें गांठोडें दुर्दैवानें घायाळ झालें. रामरावबाबा काळी यांचे चिरंजीव यशवंत नाना काळी यांनीं विणा आणून जपून ठेविलला आहे असें समजतें.

देवनाथाच्या आजमित्तीस ज्या कविता अव-लोकनांत आल्या आहेत त्या पाहूं गेलें असतां त्यांनीं स्वतंत्र अशी दोनच आख्यानें रचलेलीं आढळतात. पहिलें श्रावणाख्यान व दुसरें कृष्ण-जन्म. दोन्ही आख्यानांची कथानकें सोपीं व सर्वश्रुत अशींच आहेत. ही आख्यानें खेरीज करून त्यांनीं रचलेल्या अवांतर कवितांचा संग्रह फार मोठा आहे. त्या अनेक अध्यात्मविषयक असून विशेषेंकरून बहुतेक ईश्वरस्तुतिपर आहेत. हीं वाचून सदरहू कवी मोठा भक्तिपरायण व देवाचा

भुकेला होता असें स्पष्ट दिसून येतें. मोरोपंताच्या केकावलीप्रमाणें ही देवनाथाची भक्तिपर पदें त्यांच्या कवित्वशक्तीचें, उदात्त वैराग्याचें व प्रेमळपणाचें स्वारस्यानें परिपूर्ण आहेत. देवनाथाच्या खऱ्या कवित्वाचा मासला यांतच सांपडतो. यापैकीं कित्येक मोठमोठाले कृष्णपर व रामपर कटाव देवनाथानें हिंदुस्थानी भाषेंत रचिले आहेत देवनाथानें देवस्तुतिपर सर्व कटीबंधांनें कृष्ण, राम, मारुती, गणपती, पंढरीचा पांडुरंग गुरुदेवता वगैरे सर्व देवांची स्तुति केलेली आहे, परंतु त्या सर्वांत रामाच्या व कृष्णाच्या वर्णनाचीं पदें फारच मनोहर असून शब्दसौंदर्य, अर्थमाधुर्य, वचनकोमलता, अनप्रास, अर्थलालित्य वगैरे असंख्य गुणांनीं परिपूर्ण आहेत; तीं इतकीं कीं त्यांतील सरस कोणतें व नीरस कोणतें याचा निवाडा मुळींच करतां येत नाहीं. प्रत्येक कटिबंधांतील भाषालाघव व शब्दरचना मोठी मनोहर व चित्रविचित्र भासूं लागतें. रामजोशाच्या बोधपर लावण्याप्रमाणें देवनाथकवीचे कांहीं उपदेशपर व वेदांतपर कटिबंध आहेत त्यापैकीं “ अमोल काया जाईल वांया ” हें देवनाथाचें बोधपर पद्य आबालवृद्धांच्या तोंडीं असून तें इतकें सुरस व वैराग्यपर आहे कीं ऐकणाऱ्यास तात्कालिक स्फूर्ति उत्पन्न होते. देवनाथाच्या काव्यसौंदर्याचा, शब्दसौष्ठवाचा व अर्थलालित्याचा मासला पाहणें

असल्यास त्यांचे देवस्तुतिपर, वेदांतपर व बोधपर निवडक उतारे काव्यसंग्रहांतून दिले आहेत ते वाचून पहावे. एकंदरींत देवनाथ कवीला अमृतराय, आनंदतनय, वामन, मुक्तेश्वर, वगैरे कवींच्या मालिकेंत गोंवण्यास आम्हांस कोणतीही शंका वाटत नाहीं.

## पद.

ऐके गे! सखये! बाई! जिविंची ही खूण ।
सांगतसें तुजपाशीं श्रवणीं दे मन. ॥ ध्रुवपद. ॥
देखियलें नयनीं म्यां अद्भुत कसें, । एकचि नाथ निरंजन जगीं व्याप्त असे, ॥ जेवीं पटिं कीं तंतु हें विश्व तैसें, । एकपणीं ऐक्याची मूस वोतली असे ॥ ऐके ० ॥ १ ॥ अघटित हें गुरुनाथें दाविलें मला, । विहिर आकाशीं, खालीं वाहे प्रवाह भला, । चाले तीन पाट पाणी वाफ्या सीवला, । हातपायांविण सोका चाळी वेळोवेळां ॥ * गगनीं बैसोनि स्थिर तो । राखितो मळा. ॥ एक० ॥ २ ॥ आणिक म्यां नवल देखिलें कीं हें । दृष्टी हे उफराटी करुनियां पाहे । अद्भुत कीं ते स्थानीं एक नगर आहे । भवतालीं एक +गंगा झुळझुळ वाहे ॥ ऐके ० ॥ ३ ॥ नगराचे पूर्वेसी रविचंद्र कसे । अद्भुत तेजें गगन, उजळलें दिसे । आदि अनादि जेथें

---

* आकाशात. +.नदी.

कांहींच नसे । एकचि चित्घन चिदपठाईच असे ॥ ऐके ० ॥ अनुभविं पाहतां बाई ! रूप हाटवटी पडली ग! ते ठायीं निजऐक्यमिठी । सद्गुरुनाथ गोविंदें दाविलें ×दिठी । देवनाथ स्वच्छंदें निज-सौख्य लुटी ॥ ऐके ० ॥ ५ ॥

## ॥ पद ॥

आह्मी लिंगाईत वाणी । आमचा सवदा घ्याना कोणी । घेणाऱ्याचें हित होय न घे त्याचि हाणी ॥ ध्रुवपद. ॥ नरदेह पेठ माजी पांचखणी जाण । ज्ञान दुकान । विज्ञानेंसि वस्तु भरली शुद्ध सोऽहं केन ॥ आम्ही० ॥ १ ॥ वस्तु घेतां लाज चित्ता दुरी ठेवुनि यावें । भक्तिद्रव घ्यावें । लक्षरुपी मोज घेउनि आपिआप व्हावें ॥ आम्ही ० ॥ २ ॥ सद्भावेंसि संत गुरुसि शरण तुह्मी जावें । हित करूनि घ्यावें । देवनाथ गुज सांगे देह लया पावे ॥ आह्मी० ॥ ३ ॥

## ॥ पद ॥

अमोल काया जाईल वायां जशी कांच किं फुटे फटकन् । उभा काळ विक्राळ लक्षितो वेळ होय सावध झटकन् ॥ खुप समजा. ॥ ध्रुवपद. ॥ कृतिं त्रेतिं द्वापारीं होतीं आयुष्याची बहु भरती ॥

× दृष्टि.

कलीमाजि शतवर्षे नेमिली परि तींहि न मरति पहा पुरतीं ॥ बारा चौदा पंधरा विशांत पंचविसां-माधिं किती मरती । मागें मेले पुढेहि मरणार कोण करिल याची गणती ॥ आजा काका मामा मेला याची साक्ष घ्या चित्तीं । त्यांचे शोकें दुःखित मानस शेवट तुमची तेचि गती ॥ देह आपुला जाईल याहो धरा सोय कांहीं झटकन् । समय पातल्या उशिर न लागे गिळी काळ येउनि गटकन् ॥ खुप समजा ॥ १ ॥ हत्ती घोडे माल खजीना कोणाची मंदिर माडी । शेवटिं जाईल कांहीं न राहिल काय धरुनि याची गोडी ॥ तारुण्याच्या भरें घालशिल विषयभरें दाटुनि फुगडी । अहा रांडेच्या ! समय कठिण तो जेव्हां काळ येउनि रगडी ॥ कांता सुंदर रंभा जशी तिची मनाला प्रित गाढी । जबरदस्त हा पाश स्त्रियेचा जशी कवाडा कुलुपकडी ॥ मोहसूसरी वोंगळ जी जल पाय धरुन ओढी मटकन् । जशी नंगि समशेर देहाचें तुकडे तुकडे करि कटकन् ॥ फिर मागें ॥ २ ॥ श्रीगुरु गोविंदनाथ निरंजन पादरेणु जेव्हां वरिला । आत्मारमी ब्रम्हानुभव शुद्ध भाव तेव्हां कळला ॥ जिकडे पाहे तिकडे अवघा चराचरी चिद्घन भरला । देवनाथ ह्मणणेचि आटली लवण जळीं जैसा विरला ॥ विरला पुरला भरोनि उरला तो सुमनें गिळिला गटकन् । देहविदेही स्थिति बाणली

जन्ममरण चुकलें खटकन् ॥ धन्य गुरु. ॥ ३ ॥

॥ पद ॥

उत्तम हा नरदेह तुला लाधला पूर्वभाग्यें ।
साधन ऐसें साध कीं जेणें कीर्ति उरे मागें ॥ध्रुवपद॥
धनकणसुत कामिनि हे मानुनि सत्य स्वमन भुललें ।
न सुचे निशिदिनीं दुसरें अनुही विषयसुखा रतलें ॥
लंपट होउनि खटपट करितां पटपट वय सरलें ।
काळवेळ सन्नीध पातल्या उघडात ना डोळे ॥
समय कठिण तो संगि न होती कोणी आप्तवर्ग ।
साधन० ॥ १ ॥ समज उमज अरे गमज टाकुनी
शरण होय गुरुते । अशाश्वत तनु शाश्वत न दिसे
समज मनीं पुरते । भवभ्रश बद्धांश पाशसुखविषय
करी परते ॥ गुरुवर कर शिरि कृपावरद मग प्राप्ति
पुरे परते ॥ होंच दाहे स्थिति पूर्ण विदेही मनीं
अनुभव वेग । साधन० ॥ २ ॥ आत्मा आपण चि-
द्घन अनुभव समजुनिया देही । *समरस करि
मन तयात भोगी समाधि निजठायीं ॥ उघड
समाधी निजात्मबोधी उपाधि ति नाहीं । योग
साधि हा भोग त्यजुनि मग रोग नुरे कांहीं ॥ समां
सर्वभूतेषु+ पाहुग तरीच ×भव भंगे । साधन०
॥ ३ ॥ देवनाथ तुज हात जोडा मनखोडी सकळ

---

*. ब्रम्हानंद, एकरस. +. सर्व प्राण्यांच्या ठायीं. +. संसार.

सांडी । ज्ञान आणि विज्ञान प्रासनि पूर्ण खेळ मांडी ॥ तूं तूं तूं चैतन्य तूंचि तूं दुजा नसे धुंडी । सद्गुरुवचनें स्वात्मधनाचा भरुनि घे हुंडी ॥ मान वचन अनुमान त्यजुनि हा अनुभव घे अंगें । साधन० ॥ ४ ॥

## ॥ पद ॥

सार घ्यावा हा अनुभव देहीं । शद्बज्ञानाचें काज येथें नाहीं नाहीं ॥ ध्रु० ॥ बोलुं जातां बोलासि नुरे ठाव । पाहुं जातां पाहणें झालें + वाव । नामरूपातीत पूर्ण निरामेव§ । तरिच लाभे तुष्टेल गुरु देव देव ॥ सार० ॥ १ ॥ नयनिं येतां नयनासि स्वयं प्रासि । विकासलें स्वतेज तें जगासी । व्यापकत्वें संपूर्ण लोकवासी । स्वजनपालय संहार नाहिं ज्याती ज्यासी ॥ सार० ॥ २ ॥ नये लक्षितां लक्ष लक्ष नेटें । अणूरेणूहुनि रहान महान मोठें । अहं ब्रह्म स्मि ‡ उर्मि जेथ आटे । गुरुकृपें निज हृदयीं प्रगटे प्रगट ॥ सार० ॥ ३ ॥ नसे पाठीना पोट म्हणणें शद्ब । जया स्तविती श्रुति मौन धरिती वेद । ...पूर्ण निजानंद । देवनाथाच्या प्रभू सदानंद नंद ॥ सार० ॥ ४ ॥

---

+ व्यर्थ. § निरामय. ‡ तरंग, लाट.

## ॥ पद ॥

सोबी अकलवंत वडा हैं। नसीब सिकंदर है उसका ॥ ध्रुवपद. ॥ जबलों पल्लो गठडी तबलग ज्यो करेसो उसीका। हता रावन कीरत बडी जद अंधधुंदमो राज किया ॥ तेहतिस कोटी देव पकडके दारबंदमो कैद किया। सुनो अक्कलकी तारीफ जिन्हे चार बेदका ||खोज किया ॥ *चौदा चौकडे राज भुकाया दौलता खुब हजा लिया। छुटी पल्लोंकी गठडी जद आधघडीकू डुबा दिया। अक्कलकी बे नक्कल रही जिने समस्त कुल भस्म किया। बिभिखनने बहोत सिकाया जरा न मानें उसीका। आई कालकी घडी चुके नही फिरा काल जद देतो था ॥ बस मैत लिखी ॥ १ ॥ अनंतफंदीनें नानाफडनीसकी अक्कलको तारीफ किई। क्या है उसकी अक्कल दौलत पेशवेको डुबा दिई। ज्यो मैं करूंगा सोहि होयगा ऐसी मनमें मगरुरी भई। मालखजीना अपनें हात खावदके घर कछु

---

||. रावणानें वेदाची पदें (खंडें) केली इत्यादि कथेवर कविकटाक्ष आहे * चौकड्या (चौकडी=चार युगांचा समुदाय.) चौदा चौकड्या=छप्पन युगें. स्वर्गांत इंद्राचें राज्य छप्पन युग व पृथ्वीवर मनूचें छप्पन युगें असें समजतात.

न रही । सवाई माधवराव + मुवा जद अकलकी चोदो भुल गई । बाजीरावकू देतां गादी खोबो ज्यानत हतासही । फिरा नसीबा चुको किरिया काहा ठिकाना अकलका ॥ नमकहरामी करे खावंदसो किने बजाया है डंका ॥ बे अबी सुनो ॥ २ ॥ छोटे छोटे आदमी बढाये उसी पासमो आन खडे । अपने आगे कछु गत नही ज्यो होय सो आप बडो, । ना खावंदका घरही राखा ना फोजा साबून खडे । मनमें मगरुरी करके गाफल ना बेरीसो जरा अडे । कंबख्तीका पहेरा यारो बदमस्तोसो बहोत चढे । करम गंडिया आखर नाना ज्या सिंदेके कैद पडे । मिलाई सोई खाई यारो लिया † ठिकरा ‡ अपजसका । देवनाथ कहे मुझे गरज नहि राज डुबाया बम्हनका ॥ बे कछु न किया ॥ ३ ॥

॥ पद ॥

हम तो बैरागी बैरागी । निजरुपसो लय लागी ॥ ध्रुवपद ॥ ग्यान ध्यानका अचला । बांधा दिल मायासो बिचला ॥ हम० ॥ १ ॥ शांती § बभुत लगाई । मनकी दुग्धा मार भगाई ॥ हम० ॥ २ ॥ बुंद फुला है जरदा । वामों लाल

---

+ वारला. † टपका. ‡ अपयशाचा, अपकीर्तीचा. § विभूत [ भस्म ]

सुफेदी फरदा ॥ हम० ॥ ३ ॥ रतिपति मार लु-
टाया । जत सतका लंगोट चढाया ॥ हम० ॥ ४ ॥
श्रीगुरु गोविंद नैना । बन रहे देवनाथ मस्ताना ॥
हम० ॥ ५ ॥

॥ पद ॥

ही तनु, बहुत सुख घनु, लाधली मनु, थोर दैवें ।
हित अशात उमजावें ॥ ध्रुवपद. ॥
कि. तरी, विषयसुखभरी भरिसि, अंतरीं, कसे न
कळे ? । भोगसी दुरित सोहळे ॥
*वैखरी, स्मरेना हरी, दुःखसागरी, शरीर सगळें ।
भुललें चित्त अबळे ॥
सुसरी, नव्हे दे बरी, कन्यारीं, उरीं दिली
काळें । कां धुरें धुंद डोळे ॥
चाल ॥ सांडि हा स्वरेनी छंद, अहो छंद ।
काळानें मांडिला फंद, अहो फंद ।
कां बुद्धी झाली मंद, अहो मंद ॥
चाल दुसरी ॥ हा विचार नव्हे रे सार, अहो सार ।
या गुणें बुडाले फार, अहो फार ।
कां उगाच वाहसी भार, अहो भार ॥
टीप ॥ वदो किती, फिरेना मती, कामिनाप्रती,
तारति भावें । हित० ॥ १ ॥
हा कुभंड, प्रीतिचा भंड, होईल मग दंड,
देणें लागे । सत्पथीं म्हणुनि वागे ॥

---

* वाणी.

तो प्रचंड, यमाचा दंड, करिल तनुखंड,
फिरे मागे । उठि उठि त्वरित जागे ॥
हे बंड त्यजुनि, ‡ओदंड भजनिं अखंड,
चित्त लागे । भवमूळ समूळ भंगे ॥
चाल ॥ विषयाचा सांडी रंग, अहो रंग ।
साधूंचा धरावा संग, अहो संग ।
हरिनामें वाजवि चंग, अहो चंग ॥
चाल दुसरी ॥ धरि प्रीत हरिचे नामीं, अहो नामीं ।
नांदसी बरा सुखधामीं, अहो धामीं ।
विनटल्या मती श्रीरामीं, अहो रामीं ॥
दीप ॥ श्रीराम, पूर्ण मनुकाम, करिल विश्राम,
प्रीति गावें । हित० ॥ २ ॥
लाधली, तुला हे भली, ईश्वरीं दिली, बरी
काया । खोवितोसि हे वायां ॥
भ्रमभुली, कशी भूलली, मती भ्रष्टली, तुझी
राया । इच्छिसी द्रव्य जाया ॥
धोरली, यमें धाडिली, दूति आपुली,
चाळवाया । नेसते निरयठाया ॥
चाल ॥ नेत्राचा तीक्षण बाण, अहो बाण ।
लावोनी हरिते प्राण, अहो प्राण ।
मारिल थोर सज्ञान, अहो सज्ञान ॥
चाल दुसरी ॥ हे केवळ विषय मूळ, अहो मूळ ।

---

‡उद्दंड, विपुल.

नाशिसी हे सहकूळ, अहो कूळ ।
बहुत केली धूळ, अहो धूळ ॥
टीप ॥ चांडाळ, रांड हें जाळ, भाग्रत काळ, मनो-
भावें । हित० ॥ ३ ॥
करि त्वरा, तूं जा बरा, शरण गुरुवरा, जाय
वेगीं । श्रीगुरुराजयोगी ॥
सुख करा कृपा अंतरा, उदेल्या खरा,
दुःख भोगी । सद्भाव धरी अंगीं ॥
प्रियकरा, प्रीति अव्हेरा, स्वरूप सुख धरा,
अंतरंगीं । रंगोनि आत्मरंगीं ॥
चाल ॥ सहजची गळाला भ्रम, अहो भ्रम ।
आपणची झाला ब्रह्म, अहो ब्रम्ह ।
लाधला, सुख संभ्रम, अहो संभ्रम ॥
चाल दुसरी ॥ गुरुनाथ दयाघन थोर, अहो थोर ।
§दिनटीला सकळही घोर, अहो घोर ॥
स्वानंदे नाचे मोर, अहो मोर ।
टीप ॥ देवनाथ, भावें गुण गात, जाहली, मात न
वर्णवे । हित० ॥ ४ ॥

## ॥ पद ॥

विना भगत भगवान भजनबिन कहु कैसे भवतरण, ।
काल शिर करनें बैठा हरण. ॥ ध्रुवपद. ॥
नही फाम, बेफाम हुवा तैं, नहीं खबर तुझे जरा ।

---

§नष्ट झाला.

बिखय बिख गई जईमे परा ॥
हुवा सर्द तै, मर्द नही बेवहा दर्दनें घेरा, ।
अकलगुम बेसुध होकर परा ॥
याद पकर, मन ठौरहि धरके, गुरु दरवाजे खरा ।
जाय बेनाहक भ्रमसो भरा ॥
दयाल श्रीगुरुराज देव रसराज दर्दका पुरा ।
पलखमे चुके कालका फेरा ॥
मान बचन, अनुमान डारके जाय, पकर गुरुचरन ।
॥ काल० ॥ १ ॥
कहां माडी और कहां अटारी कहां दौलत रथ घोडे ।
काल जब आन छातिसों भिडे ॥
माइबाप और भाई कबीला लडके छोटे बडे ।
कोई नहि नजीक रहते खडे ॥
जलदी जलदी उठाव मट्टी, पुकार यहि सब पडे ।
कि जब तन तेरा अचेतन पडे ॥
झूटा काया झूटी माया घटे रोग ये बढे ।
खुशी हो बजाय जम चौघडे ॥
कोउ नहि अपना, सपना सारा, पकड ग्यानकी
धरन । काल० ॥ २ ॥
ग्यान दे येही अपना, देख सुरत कर जरा ।
बनाया अजब तर्हे पींजरा ॥
अंदर तोता राज करता, घट घट मे है भरा ।
सुरत महबूब पाक चेहरा ॥
नहि काला नहि पीला नीला नहीं लाल नहि हरा ।

रंगाविन रंग खूब एक तरा ॥
वो तो तूही, तुजबिन कोई और नहीं दूसरा ।
गुरुबिन ग्यान मिलेना पुरा ॥
मन साफीसो गुरूचरणसो भाव पकर, हो शरन ।
काल० ॥ ३ ॥
गुरुमेहरसो चुके कदर, दिलदार बहार वो मिले ।
हमेश मस्त मगनमो झुले ॥
रामनामकी नौबत बाजे, ग्यानगोधडी गले ।
सुनोजी भाग उनोके खुले ॥
आपहि अपने साथी गुरु फिर आपहि अपने चेले, ।
आपमो आप भये मतवाले ॥
अजब खेल साहेबका जिसको भाग उसीकू मिले ।
कि निगुरे मायामो ज्यो भुले ॥
देवनाथ कहे साव चुकावे गुरू जनम और मरन. ।
काल० ॥ ४ ॥

देवनाथ महाराज यांची गुरुशिष्य परंपरा अशी आहे की—जगविख्यात श्री एकनाथ महाराज, त्यांचे शिष्य नित्यानंद, त्यांचे शिष्य कृष्णानंद, त्यांचे शिष्य इसानंद, त्यांचे शिष्य मुन्हारनाथ, त्यांचे शिष्य रंगनाथ, त्यांचे शिष्य गोपाळनाथ, त्यांचे शिष्य गोविंदनाथ, व त्यांचे शिष्य देवनाथ. देवनाथ महाराजांचे रामराव बाबा काळी व दयाळनाथ हे मुख्य दोन शिष्य होत.

या गुरुपरंपरांतील श्री एकनाथ महाराजांचे संबंधानें येथें विशेष उल्लेख करण्याचें मुळींच प्रयोजन नाहीं. ज्या साधु कवींनीं मुमुक्षु लोकांपाठीं या भरतखंडांत अमूल्य ज्ञानभांडार ठेविलें आहे त्यांत एकनाथ महाराजांनीं पुष्कळ भर टाकली आहे हें सुप्रसिद्धच आहे. आतां नित्यानंद महाराजांपासून तों गोविंदनाथ महाराजांपर्यंतची नामावळी घेतली तरी त्या प्रत्येक साधुपुरुषाचें चरित्रलेखन करण्यासारखें असून त्यांपैकीं पुष्कळांनीं थोड्या-बहुत ईश्वरस्तुतिपर व बोधपर कविता केल्या आहेत असें कळतें.

गुरु गोपाळनाथ व गुरु गोविंदनाथ हे महान् भगवद्भक्त होते. गोपाळनाथ हे साताऱ्याजवळ तिरपुटी म्हणून गांव आहे तेथील राहणारे होते असें म्हणतात. ते साताऱ्यास दरबारीं कारकुनीचे कामावर होते. पुढें त्यांचे यजमान त्यांना योग्य कारण नसतां फार टाकून बोलल्यामुळें ते फार संतप्त झाले व ते रागाच्या सपाट्यांत नोकरी सोडून तिरपुटीस जाऊन श्री मारुतीचे आराधनेस बसले अशी आख्यायिका आहे. पुढें त्या प्रांतांत ते चांगल्या लौकिकास चढून सर्वांस पूज्य झाले. शिष्यवर्गाहि पुष्कळ वाढला. त्यांनीं पुष्कळ कविता केल्या आहेत पण त्या फारशा उपलब्ध नाहींत.

गोविंदनाथ हे कोकणस्थ ब्राह्मण होते. हे

गोपाळनाथ यांचे मुख्य शिष्य होते. यांनीं गुरूंची सेवा फार दिवस मोठ्या प्रेमानें व भक्तीनें केल्यामुळें संतमंडळींत ते मोठ्या थोरवीस चढले. ते नेहमी तीर्थाटनें करीत असत. फिरत फिरत ते वऱ्हाडांत सुर्जीअंजनगांवीं आल्यावर तेथें त्यांनीं देवनाथ यांस उपदेश दिला व नंतर ते अकोलें तालुक्यांतील वुस्सर गांवीं जाऊन राहिले. तेथें त्यांचें घर आहे. ते अगरीं मोडकळीस आलें व तेथें एक श्री विठ्ठलाची मूर्ति स्थापन करून सर्व व्यवस्था केली.

देवनाथ महाराज यांचे वऱ्हाडांत रामराव बाबा काळी व दयाळनाथ असे दोन मुख्य शिष्य होते हें पूर्वीं सांगितलेंच आहे. काळी ( अश्वलायन ब्राह्मण ) हे इलिचपूरचे राहणारे. यांचें घराणें फार जुनाट व नामांकित आहे. रामराव बाबा काळी यांचे आजे राजा तिमिराय काळी हे इलिचपूरचे प्रसिद्ध नबाब इस्मायलखां पन्नी यांचे दोन पुत्रांपैकीं वडील पुत्र यशवंतराव नाना काळी जे हल्लीं इलिचपुरास आहेत व कनिष्ठ पुत्र पांडुरंगनाथ यांचे गोपाळनाथ, गोविंदनाथ व भगवंतनाथ असे तीन पुत्र बऱ्हाणपूर येथें नाथमठाधिकारी आहेत. पांडुरंगनाथ हे चांगलें कीर्तन करीत असत व त्यांनीं कांहीं सुरस कविताही केल्या आहेत. काळी यांचें घराणें इलिचपुरास व बऱ्हाणपुरास मोठें पूज्य

मानलें जातें. इलिचपूरचे मठांत देवनाथ महाराजांच्या कवितांचा पुष्कळ संग्रह असून तो नाना काळीं यानीं चांगल्या रीतीनें जतन करून ठेवला आहे ही विशेष समाधानाची गोष्ट होय.

दयाळनाथ ( यजुर्वेदी ब्राह्मण )—यांचें नांव वऱ्हाडांत व नागपूर प्रांतांत सुप्रसिद्ध आहे. हे उमरखेडचे राहणार. दयाळनाथ यांचेवर देवनाथ यांचा चांगला वरदहस्त होता. बोधपर व वेदांतपर अशा पुष्कळ कविता त्यानीं केल्या आहेत. त्यांच्या कथेची शैली फार चांगली असे. ते देवनाथ यांचे बरोबर देशाटन करीत असत. अशी एक आख्यायिका आहे कीं देवनाथ महाराज एकवेळीं हैद्राबादेस गेले असतां तेथें एके ठिकाणीं त्यांची कथा होणार होती; पण त्या दिवशीं त्यांची प्रकृति बरी नसल्यामुळें त्यांच्याच्यानें कथा करण्यास जाववेना. नाथाचा लौकिक ऐकून कथेच्या समारंभाचे ठिकाणीं श्रोतृसमाज मोठा जमला होता. त्यांचा विरस होण्याचा प्रसंग आला हें पाहून देवनाथानें दयाळनाथास कथा करण्यास पाठवून दिलें व तूं फत्ते करून येशील असा त्यास आशीर्वाद दिला. पुढें असा चमत्कार झाला कीं दयाळनाथाची कथा फार सुंदर वठून सर्वतोमुखीं त्यांची स्तुति झाली. त्यांची सुर्जी येथें समाधी आहे.

# प्रमोदसिंधु.

## छापखाना

### अमरावती.

" प्रमोदसिंधु " नांवाचें साप्ताहिक वर्तमानपत्र आज ३४ वर्षे अव्याहत चालू असून यांत सामाजिक, धार्मिक, [illegible]गिक वगैरे उपयुक्त विषयावर चांगले चांग[illegible] येत असून निरनिराळ्या प्रकारच्या उप[illegible]क व चमत्कारिक बातम्या भरपूर येत असतात. [illegible] वाटेल तेव्हां सुरू करतां येते.

या छापखान्यांत सर्व प्रकारचीं छपाईचीं कामें वाटेल त्या रंगांत सुबकपणें व वक्तशीर करून दिलीं जातील.

या छापखान्यांत कुळाच्या पावती वह्या, बाजारपास बुकें, आठवडा रिपोर्ट, राजीनामे, कबुलायती, वकीलपत्रें, दरखास्त व जमाबंदीचे नमुने वगैरे विकत मिळतील. बाहेरगांवीं व्ही. पी. नें मागविल्यास पाठवूं.